सोमवार, दि. १७ ऑक्टोंबर,२०२२

## आझादी का अमृतमहोत्सवाचे औचित्य साधत मराठी विभाग आयोजित
## प्रा. डॉ. एन. डी. पाटील स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमाला
## विषय – डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राला काय दिले
### वक्ते – मा. प्रा. निरंजन फरांदे
### अहवाल

''डॉ. एन. डी. पाटील यांनी आपल्या जीवन-कार्यांतून त्याग, निस्पृहता, समर्पण, निष्ठा ही जीवनमूल्ये महाराष्ट्राला शिकवली. त्यांचे संपूर्ण जीवन गोरगरिब, कष्टकरी, शेतकरी आत्रण सर्वसामान्य माणसांना न्याय मिळवून देण्याच्या ध्यासाने वेढले होते. आजच्या काळात असे तत्त्वनिष्ठ लोकनेता मिळणे दुर्मीळ झाले आहे. अभ्यासू, विश्लेषक, सर्वसामान्यांच्या वेदनेची जाण असणारा कनवाळूपणा अंगी बाणणारे एन.डी. पाटील हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते.'' असे प्रतिपादन प्रा. निरंजन फरांदे यांनी केले. ते रामानंदनगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात बोलत होते. मराठी विभागाच्या वतीने प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे. के. जाधव, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य महेंद्र (आप्पा) लाड, व्ही. वाय. (आबा) पाटील उपस्थित होते.

जे. के. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या व्याख्यानात फरांदे पुढे म्हणाले, ''आज महाराष्ट्रासह देश भयंकर वर्तमानातून पुढे जात आहे. कोणत्याही प्रकारची ठोस वैचारिक बैठक नसल्यामुळे राजकर्त्यांकडून जनसामान्यांच्या हिताचे कोणतेही लोकोपयोगी निर्णय घेतले जात नाहीत. सर्वसामान्यांच्या प्रश्नांचे कुणालाच काही देणेघेणे नाही. अशा काळात प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांची प्रश्न उपस्थित करणारी, चिकित्सेने प्रश्नाच्या तळाला जाणारी जीवनदृष्टी तरुणांनी अंगीकारणे, हीच खरी त्यांना श्रद्धांजली ठरणार आहे.''

अध्यक्षीय मनोगतात जे. के. जाधव म्हणाले, ''एन. डी. पाटील यांचा प्रत्यके लढ्याला दोन बाजू होत्या. एक वैचारिक आणि दुसरी प्रत्यक्ष लोकसहभागाची. स्वातंत्रोत्तर काळात सर्वसामान्य लोकांच्या प्रश्नांसाठी दीर्घकाळ तहयात शासन यंत्रणेसह झगडणारा नेता म्हणून एन.डीं.ना ओळखले जाईल.'' यावेळी प्र. प्राचार्य डॉ. टी. एस. भोसले यांनी प्रास्ताविक व भूमिका कथन केले. पाहुण्यांची ओळख डॉ. तेजस चव्हाण, आभार प्रा. दिलीप कोने यांनी व्यक्त केले. तर सूत्रसंचालन प्रा. स्वाती मगदूम यांनी मानले.

**निष्पत्ती :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांच्या सामाजिक कार्याचे महत्त्व कळाले.

**लाभार्थी :** 88

व्याख्यानमालेची काही क्षणचित्रे पुढील पानावर ...

## काही क्षणचित्रे....

**विषय** –प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी महाराष्ट्राला काय दिले **वक्ते** – मा. प्रा. निरंजन फरांदे











विभागप्रमुख
मराठी विभाग
**मराठी विभाग प्रमुख,**
**डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय,**
**रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.**

प्र. प्राचार्य
डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली)